# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेच्या मॉडर्न कम्युनिकेशन चॅनलचे व्यवस्थापन
**{जनसंपर्क विभाग}** करण्यासाठी जाहिरात क्र. 494/पी.आर. दि.04.10.2023 नुसार नव्याने ई-निविदा मागविल्या होत्या. प्राप्त झालेल्या तीन निविदा तांत्रिक मूल्यांकनामध्ये पात्र ठरल्या. तीन निविदाकारांची आर्थिक दरपत्रिका (Financial Bid) उघडण्यात आली असता मेसर्स आय.टी. क्राफ्ट टेक्नॉलॉजीस प्रा.लि. नागपूर यांचे दर दरमहा व्यवस्थापन शुल्क रु. 2,46,000/- (दोन लाख छेचाळीस हजार) निम्नतम (L-1) ठरत असल्यामुळे त्यांची निविदा मंजूरकरुन वाटाघाटी दरम्यान शुल्क 2,46,000/- ऐवजी दरमहा रु. 2,38,360/- (GST सह) या दरावर काम करण्याची सहमती दर्शविल्याने सदर संस्थेला दोन वर्षाकरीता कार्यादेश देणे व रु. 28.60 लक्ष वार्षिक याप्रमाणे खर्चास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- नागपूर महानगरपालिकेच्या मॉडर्न कम्युनिकेशन चॅनलचे व्यवस्थापन करण्यासाठी विद्यमान एजंसी मेसर्स आय.टी. क्राफ्ट टेक्नॉलॉजीस प्रा.लि. नागपूर यांचे कार्यादेशाची मुदत दि. 31.07.2023 रोजी संपुष्टात येत असल्याने नव्याने निविदा मागवून पुढील दोन वर्षाकरीता एजंसीची नेमणूक करण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी स्थायी ठराव क्र. 540/मनपा/प्रशासक दि. 28.09.2023 नुसार मंजूरी प्राप्त झाली होती. तसेच नवीन एजंसीची नियुक्ती होईपर्यंत विद्यमान एजंसीला मुदतवाढ देण्यास देखील मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा मंजुर मासिक दरानुसार वार्षिक खर्च रु. 28.60 लक्ष जनसंपर्क विभागाचे (सा.प्र.विभाग) पद क्र. A20100120308 मध्ये सन 2023-24 साठी एकुण रु. 300 लक्ष मंजुर प्रावधानातुन करण्यात येईल. सविस्तर टिपणी नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 681/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 02/01/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त (साप्रवि), जनसंपर्क विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या मॉडर्न कम्युनिकेशन चॅनलचे व्यवस्थापन करण्यासाठी जाहिरात क्र. 494/पी.आर. दि.04.10.2023 नुसार नव्याने ई-निविदा मागविल्या होत्या. प्राप्त झालेल्या तीन निविदा तांत्रिक मूल्यांकनामध्ये पात्र ठरल्या. तीन निविदाकारांची आर्थिक दरपत्रिका (Financial Bid) उघडण्यात आली असता मेसर्स आय.टी. क्राफ्ट टेक्नॉलॉजीस प्रा.लि. नागपूर यांचे दर दरमहा व्यवस्थापन शुल्क रु. 2,46,000/- (दोन लाख छेचाळीस हजार) निम्नतम (L-1) ठरत असल्यामुळे त्यांची निविदा मंजूरकरुन वाटाघाटी दरम्यान शुल्क 2,46,000/- ऐवजी दरमहा रु. 2,38,360/- (GST सह) या दरावर काम करण्याची सहमती दर्शविल्याने सदर संस्थेला दोन वर्षाकरीता कार्यादेश देणे व रु. 28.60 लक्ष वार्षिक याप्रमाणे खर्चास मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.